दै. लोकमत
15 ऑक्टोबर 2018

## शासकीय तंत्रनिकेतनसमवेत सामंजस्य करार; नव्या क्षेत्रात करिअरची युवकांना संधी

# 'कमला'मध्ये मिळणार 'ज्वेलरी डिझायनिंग'चे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कमला महाविद्यालयात आता विद्यार्थिनींनी 'ज्वेलरी डिझायनिग'चे धडे गिरविता येणार आहेत. या महाविद्यालयाने शासकीय तंत्रनिकेतनमधील सेंटर ऑफ एक्सलन्स इन जेम्स् अ‍ॅण्ड ज्वेलरी यांच्यासमवेत सामंजस्य करार केला.

या सेंटरची मान्यता असलेले ज्वेलरी डिझायनिंग संदर्भात अल्प कालावधीचे विविध अभ्यासक्रम चालविण्यात येणार आहेत. या करारामुळे कमला महाविद्यालयातील विद्यार्थिनींना नव्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.



कोल्हापुरातील कमला महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतन यांच्यात ज्वेलरी डिझायनिंग अभ्यासक्रमाबाबत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी क्रांतीकुमार पाटील, जे. बी. पाटील, प्रशांत पट्टलवार, शशांक मांडरे, आदी उपस्थित होते.

या कराराप्रसंगी ज्वेलरी डिझायनर राजन गोंदकर यांनी 'जेम्स आणि ज्वेलरी डिझाईन क्षेत्रातील संधी'या विषयावर मार्गदर्शन केले. गोंदकर म्हणाले, पारंपरिक दागिन्यांसह डिझायनर, गोल्ड प्लेटेड दागिन्यांना खूप मागणी आहे. स्त्रियांकडे मूलतः कलात्मकता असते; त्यामुळे या क्षेत्रात स्त्रिया खूप चांगल्याप्रकारे करिअर करू शकतात. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, व्यवसायाभिमुख शिक्षण हा उद्देश ठेऊन कमला महाविद्यालयामध्ये बी. व्होक रिटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड आय. टी. हा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रशांत पट्टलवार यांनी ज्वेलरी डिझायनर क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या विविध संधींची माहिती दिली.

यावेळी शशांक मांडरे, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, उपप्राचार्य पी. एस. जाधव उपस्थित होते. सुजाता जगताप, आरती कणीरे यांनी स्वागत केले. वर्षा मैंदर्गी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. पूजा खोपकर यांनी सूत्रसंचालन केले. प्राची खाडे यांनी आभार मानले.

Scanned by CamScanner